# बॅ. खर्डेकर यांच्या शैक्षणिक कार्यावर वेबिनारचे आयोजन

कोल्हापूर : बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्तोत्र केंद्र, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ व बॅरिस्टर श्रीमंत बाळासाहेब खर्डेकर – निंबाळकर फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार २४ रोजी बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त 'बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांचे शैक्षणिक कार्य' या विषयावर राज्यस्तरीय ऑनलाईन वेबिनार आयोजित केले आहे. कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून प्रा. बी. जी मांगले (अध्यक्ष जागर फौंडेशन) हे 'बॅ.बाळासाहेब खर्डेकर यांचे शैक्षणिक कार्य' तसेच प्रा. मनोज गुजर (सहाय्यक प्राध्यापक सांभाजीराव निकम महाविद्यालय कोरेगांव) हे 'बॅ. बाळासाहेब खर्डेकर : व्यक्ती आणि कार्य'या विषयावर मार्गदर्शन करतील. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत.

# 'कोरे अभियांत्रिकी'स स्वायत्त अभिमत संस्थेचा दर्जा

प्रतिनिधी
वारणानगर

येथील श्री वारणा विभाग शिक्षण मंडळ संचलित तात्यासाहेब कोरे अभियांत्रिकी महाविद्यालय गेल्या ३८ वर्षांपासून अभियांत्रिकी शिक्षणामध्ये दर्जेदार शिक्षण देत आहे. अशा या महाविद्यालयास स्वायत्त अभिमत संस्थेचा दर्जा मिळाला असून ही मान्यता यूजीसी आणि शिवाजी विद्यापीठाकडून महाविद्यालयाला मिळाली असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष आमदार विनय कोरे यांनी सोमवारी दिली.



स्वायत्त महाविद्यालय झाल्यानंतरसुद्धा पदवी आणि पदव्युत्तर प्रवेश हे महाराष्ट्र राज्याच्या प्रवेश प्रक्रियेच्या नियमानुसार होतील असेही आमदार कोरे यांनी सांगीतले. यावेळी श्री वारणा शिक्षण मंडळाच्या प्रशासकीय अधिकारी डॉ. वासंती रासम, प्राचार्य डॉ. सुनील आडेकर यांच्यासह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा मिळाल्यामुळे महाविद्यालयाला इंडस्ट्री ओरिएंटेड अभ्यासक्रम तयार करता येतील. तसेच नवीन कोर्सेस सुरू करता येतील. त्याचाच भाग म्हणून महाविद्यालयाने सेंटर ऑफ एक्सलन्स सुरू केले आहे. अभ्यासक्रम सुरू करताना हे अभ्यासक्रम जागतिक पातळीवर स्पर्धा करणारे असतील असा विश्वास आमदार कोरे यांनी व्यक्त केला. अभ्यासक्रमाबरोबरच ऑटोनंबर स्टेटसमुळे महाविद्यालय स्वतः परीक्षा घेईल व त्याचा निकालही जाहीर करेल. स्वायत्त महाविद्यालयाच्या स्टेटसमुळे विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करता येतील असे त्यांनी सांगीतले.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील उद्योजक आणि संस्थांच्या बरोबर सामंजस्य करार करण्यावर भर देणार आहे. त्याचबरोबर महाविद्यालय चॉईस बेस्ट कॅडेट सिस्टम आणि क्रेडिट कोर्स यावर प्रमुख्याने भर दिला जाईल. त्यामुळे स्वायत्त महाविद्यालयामुळे तृतीय आणि चतुर्थ वर्षाच्या विद्यार्थ्यांना इंटरशिपच्या भरपूर संधी उपलब्ध होतील आणि महाविद्यालय येत्या काही वर्षांमध्ये महाराष्ट्रातील सर्वोत्तम स्वायत्त महाविद्यालयापैकी एक महाविद्यालय होईल असा विश्वास यावेळी आमदार कोरे यांनी व्यक्त केला.

# स्पर्धा परीक्षा केंद्रात खुल्या संवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात गेल्या अनेक वर्षापासून विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी) योजनेअंतर्गत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू होते. या केंद्रात अनुसुचित जाती, जमाती, ओबीसी, ओपनच्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात होता. परंतू अनुसुचित जाती संवर्गातील विद्यार्थ्यांचे अर्ज जास्त असल्याने इतरांना प्रवेश मिळत नव्हते. आता युजीसीचे अनुदान बंद झाल्याने विद्यापीठ अनुदानातून हे केंद्र चालवले जाते. त्यामुळे खुल्या संवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचा निर्णय विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला. ही बैठक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सचिवपदी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते.

शिवाजी विद्यापीठातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात १२५ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. युजीसी अनुदान दिले जात होते. परंतू युजीसीकडून अनुदान बंद झाले आहे. महाराष्ट्र शासनाकडून अनुदान मिळणे अपेक्षित आहे. विद्यार्थी हित लक्षात घेऊन विद्यापीठाच्या अनुदानातून हे केंद्र सुरू आहे.

त्यामुळे सर्वच संवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचा मुद्दा समोर आल्याने व्यवस्थापन परिषदेने तो मंजूर केला आहे. यासह अन्य अॅकॅडमीक विषय मंजूर करण्यात आले आहेत.